लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा
भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१
दूरध्वनी क्र.०२२—२६४७२७८७/२६४७३५८८
E-Mail: scc-bandra@bhc.gov.in

# जाहीर निविदा

लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा भास्कर इमारत येथील तिसरा मजला ते आठवा मजला येथे बसविण्यात आलेल्या अग्निशमन यंत्रांमध्ये वायू/रसायनांचा ( Refilling of Fire Extinguishers ) भरणा करण्यासाठी मोहोरबंद (Sealed) दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**भरणा करावयाच्या अग्निशमन यंत्रांचा तपशील खालीलप्रमाणे.**

| Sr. No. | Description of Articles | Total Number of Fire Extinguishers to be refilled |
|---|---|---|
| 1. | Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (9 kg. Capacity) | 13 |
| 2. | Refilling of Water Co2 type Fire Extinguishers (9 Ltr. Capacity) | 12 |
| 3. | Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (5 kg. Capacity) | 17 |
| 4. | Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (2 kg. Capacity) | 1 |
| | TOTAL : | **43** |

तरी इच्छुक ठेकेदारांनी आपल्ये दरपत्रके **मोहोरबंद लखोटयामध्ये**, त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **" Quotation for Refilling of Fire Extinguishers "** व संपर्क क्रमांक लिहून त्या **"अप्पर प्रबंधक, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१"** यांच्याकडे **दिनांक २१, जून २०२४ पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. सदर सविस्तर दरपत्रक सुचनांची माहिती मा.उच्च न्यायालय, मुंबईच्या

https://bombayhighcourt.nic.in व लघुवाद न्यायालय, मुंबई च्या https://sccmumbai.dcourts.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

तसेच न्यायालयाच्या संबंधित समितीसमोर दरपत्रके उघडण्यात येणारी तारीख आपल्याला संपर्क करुन कळवण्यात येईल. सदरवेळी दरपत्रकधारक किंवा त्यांच्या मार्फत अधिकृत प्रतिनिधी यांनी हजर राहावे लागेल याची कृपया नोंद घ्यावी. दरपत्रक स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा/नाकारण्याचा अंतिम अधिकार हा मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांचा असेल.

(आर. के. हजारे)
अप्पर प्रबंधक

लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा )
मुंबई: ३१, मे २०२४ )

**लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा**
**भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१.**

# <u>दरपत्रक सुचना</u>

**अग्निशमन उपकरणांमध्ये (Fire Extinguishers) वायू/रसायन भरणा (Refilling) करण्यासाठी दरपत्रकधारकांनी अंमलात आणावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**

| | |
|---|---|
| १. | दरपत्रक संस्थेने महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचानालय, (Directorate of Maharashtra Fire Services) मुंबई, एच. बी. मार्ग, कोलीवरीगांव, यशवंत नगर, कलिना, सांताक्रुझ, पूर्व, मुंबई — ४०० ०९८ या अंतर्गत नोंदणीकृत परवान्याची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. |
| २. | दरपत्रकधारकाने / संस्थेने आयकर रिटर्न भरले बाबत मागील तीन वर्षाच्या साक्षांकित प्रती, सेवाकर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, पॅन कार्ड, जी.एस.टी. कमांक, इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकीत प्रती देखील दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे पुर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता, ई—मेल आयडी, दुरध्वनी कमांक/भ्रमणध्वनी कमांक दरपत्रक पाकीटावर ठळक अक्षरात नमूद करावे. |
| ३. | दरपत्रकधारकाने/संस्थेने यापूर्वी ज्या ठिकाणी अग्निशमन उपकरणांमध्ये वायू/रसायन भरणा केलेला आहे. त्याचा तपशील व सदर संस्थेने/कार्यालयाने वितरीत केलेले सदर कामाबाबतचे प्रमाणपत्र/पत्र दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. |
| ४. | दरपत्रकधारकाने / संस्थेने दरपत्रक विहित नमुन्यात मोहोरबंद लखोटयाच्या वरच्या भागावर मोठ्या अक्षरात **“अग्निशमन उपकरणांमध्ये (Fire Extinguishers) वायू/रसायन भरणा (Refilling) करण्यासाठी दरपत्रक”** असे लिहून **“अप्पर प्रबंधक, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१” यांच्याकडे दिनांक २१ जून, २०२४ पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पद्धतीने पाठवाव्यात. |
| ५. | पात्र ठरलेल्या दरपत्रकधारकाने / संस्थेचे देयक पारित करण्यासाठी कार्यालयीन प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर सदरचे देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकधारकाला रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| | रक्कम अदा करण्यासाठी देयकासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, रद्द धनादेश तसेच बॅकेच्या खाते पुस्तकाचे पहिले पान अथवा अदाता नोंदणी प्रमाणपत्र याची छायांकित प्रत देणे अनिवार्य आहे. |
| ६. | दरपत्रक शुल्क (Tender Fees INR) रक्कम म्हणून रुपये १,७००/— (रुपये एक हजार सातशे फक्त) (विनापरतावा) व बयाना रक्कम (EMD INR) सव म्हणून रुपये ८,५००/— (रुपये आठ हजार पाचशे फक्त) (परतावा व्याजरहीत) चे धनाकर्ष (Demand Draft) दरपत्रकासोबत देणे आवश्यक आहेत. **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबइ— ०२"** या नावाने वरील प्रमाणे धनाकर्ष सोबत दिलेले नसतील तर सदर दरपत्रक स्विकारले जाणार नाही. जे दरपत्रक स्विकारले जाईल त्यांची बायाना रक्कम करार संपेपर्यंत ठेवण्यात येईल व इतर दरपत्रकाधांची बयाना रक्कम परत करण्यात येईल. (दरपत्रक फी रक्कम व बयाना रक्कम धनाकर्षाद्वारे (Demand Draft) दरपत्रकासोबत द्यावयाचे आहेत.) |
| ७. | सुक्ष्म व लघु मध्यम उद्योग विकास अधिनियम — २००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना व शासकीयमंडळ /महामंडळ/उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठदार यांना दरपत्रक शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल परंतु सदरचे प्रमाणपत्र त्यांच्याकडे उपलब्ध असणे गरजेचे आहे. तसेच ज्या दरपत्रकांकडे सदरचे प्रमाणपत्र नसेल त्यांना दरपत्रक शुल्क व बयाना रक्कम भरावी लागेल. |
| ८. | जाहीर निविदा हया संबंधीत समितीच्या निर्णयानुसार ठराविक दिवशी या न्यायालयाच्या संबधीत समितीसमोर उघडण्यात येतील. त्यावेळेस दरपत्रकाधारकाने किंवा अधिकृत प्रतिनिधी यांनी हजर राहावे. त्यावेळेस हजर नसलेल्या दरपत्रकाधारकांची कुठल्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| ९. | ४३ अग्निशमन उपकरणांमध्ये वायू / रसायनांचा भरणा करावयाचा असल्याने सदरची रक्कम तपशीलवार दरपत्रकांमध्ये करावायाची आहे. (प्रति नगाप्रमाणे) |
| १०. | दरपत्रकधारक सहभागी दरपत्रक प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर जाहीर दरपत्रकातून माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल. |
| ११. | दरपत्रक हे दरपत्रकधारकांच्या किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या समोर उघडले जातील. त्यावेळी हजर नसलेल्या दरपत्रकाधारंकाची व त्यांच्या प्रतिनिधीची कुठलीही तक्रार नंतर एकली जाणार नाही. दरपत्रक उघडले जातील ती तारीख दरपत्रकाधारकास दरपत्रक उघडण्यापूर्वी कळविण्यात येईल. |

| | |
|---|---|
| १२. | मा.मुख्य न्यायाधीश साहेब यांना दरपत्रक प्रक्रिया रद्द किंवा त्यामध्ये बदल करण्याचे पूर्ण अधिकार राहतील. त्याबद्दल कोणतीही तक्रार वा आक्षेप स्विकारले जाणार नाहीत. |
| १३. | दरपत्रकधारकाने / संस्थेन दरपत्रकासोबत असलेल्या सर्व अटी मंजूर असल्याचे व त्या अटींचे पालन करण्यात येईल असे लेखी हमीपत्र द्यावे लागेल. |

लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा )
)
)
मुंबई: ३१ मे, २०२४ )

(आर. के. हजारे)
अप्पर प्रबंधक